

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०० वा | मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

‘आम्ही अजितदादांना मारलंय, तुम्ही तर किरकोळ लोक आहात!’

राणा सूर्यवंशीशी संबंधित महिलेची धमकी..!

रोहित पवारांचा खळबळजनक आरोप; YZ प्रकारच्या राणा सुर्यवंशी ला Y+ सुरक्षा..?



मुंबई (कटूसत्य वृत्त) : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताचा मुद्दा उपस्थित करून सातत्याने प्रश्न विचारणारे आमदार रोहित पवार यांनी आता बारामती परिसरातील अनिता नामक महिलेच्या धमकीचा धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे. 'आम्ही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना मारलं आहे, तुम्ही तर खूप किरकोळ लोक आहात,' अशा शब्दांत अनिता नावाच्या महिलेने धमकी दिल्याचा आरोप रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. या महिलेचे राणा सूर्यवंशी यांच्याशी संबंध असल्याचा दावाही त्यांनी केला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांनुसार, संबंधित महिला स्वतःची महिला बाउन्सर कंपनी चालवते. खोटे तक्रारदार उभे करणे, पोलिसांवर दबाव आणून खोट्या केसेस दाखल करण्याचा प्रयत्न करणे आणि त्यातून खंडणी उकळणे, अशा प्रकारचे गंभीर आरोप या महिलेवर करण्यात आले आहेत. इतकेच नव्हे, तर तक्रार देण्यासाठी पुढे येणाऱ्या लोकांनाही ती धमकावत असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, या महिलेचा संबंध बारामतीचं नाव बदनाम करणाऱ्या व YZ प्रकारच्या राणा सूर्यवंशी याच्याशी आणि महिला आयोगाशीही तिचे संबंध असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर वादग्रस्त उद्योजक राणा सुर्यवंशी याला नेमके कोणाच्या शिफारशीवरून आणि कोणत्या निकषांच्या आधारे Y+ दर्जाची सुरक्षा देण्यात आली होती, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. वादग्रस्त

Y+ सुरक्षा नेमकी कोणासाठी आणि कशासाठी ?

Y+ सुरक्षा ही केवळ प्रतिष्ठेची बाब नसून सार्वजनिक पैशातून दिली जाणारी महत्त्वाची सुरक्षा व्यवस्था आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला ही सुरक्षा देताना कोणत्या धोक्याचे मूल्यमापन करण्यात आले, कोणत्या यंत्रणेने शिफारस केली आणि त्यामागे नेमके कोणते निकष होते, याची माहिती समोर येणे गरजेचे आहे. रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर या सुरक्षा व्यवस्थेच्या निर्णयाचीही निष्पक्ष तपासणी व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.

अजित पवार यांच्या अपघाताबाबत उपस्थित होणारे प्रश्न, राणा सूर्यवंशी यांच्याशी संबंधित आरोप, महिलेने दिल्याचा दावा करण्यात आलेला धमकीचा इशारा आणि Y+ सुरक्षेचा मुद्दा या सगळ्यांची स्वतंत्रपणे तसेच परस्परसंबंधांच्या दृष्टीने तपासणी होणे आवश्यक आहे.



आरोपांच्या भोवऱ्यात असलेल्या व्यक्तीला एवढ्या उच्च दर्जाची सुरक्षा का देण्यात आली, याचीही चौकशी झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. (पान 2 वर..)

'मफलर मॅन' म्हणून रोहित पवारांनी दाखवला फडणवीसांचा फोटो !

म्हणाले ‘या व्यक्तीने घातपात केला असं..’



महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप

पुणे (कटूसत्य वृत्त):- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. या प्रकरणी घेतलेल्या सातव्या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी 'मफलर मॅन'चा (पान 2 वर..)

भाजपचे नवनाथ बन काय म्हणाले ?

रोहित पवारांच्या आरोपांना उत्तर देताना भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. 'एका कार्यक्रमात जाण्याचा आणि अजित पवारांच्या अपघाताचा काय संबंध ? एका फोटोवरून अपघाताचे कनेक्शन जोडणे चुकीचे आहे,' असे ते म्हणाले. रोहित पवार प्रसिद्धी मिळवण्यासाठी आणि चर्चेत राहण्यासाठी अशा पत्रकार परिषदा घेत असल्याची टीकाही त्यांनी केली. 'आजपर्यंत त्यांनी अनेक पत्रकार परिषदा घेतल्या; मात्र एकही ठोस पुरावा दिलेला नाही,' असा दावा बन यांनी केला.या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात आली असून ती चौकशी करेल, असे नवनाथ बन यांनी सांगितले. दुसरीकडे रोहित पवार यांनी सीबीआय चौकशीची मागणी पुन्हा उपस्थित केली आहे.



हजारो मुलींचे संसार थाटणारे मगन भगवान बाबर काळाच्या पडद्याआड

विवाह जुळविण्याच्या सामाजिक कार्यातून हजारो कुटुंबांशी जिव्हाळ्याचे नाते; वडशिंगे परिसरात आजही हळहळ...!



समाजात अनेक माणसे आपल्या कर्तृत्वाने ओळख निर्माण करतात; मात्र काही व्यक्ती आपल्या कार्यातून हजारो कुटुंबांच्या आयुष्यात आनंद फुलवतात. अशाच माणुसकीचा वारसा जपणारे वडशिंगे (ता. माढा) येथील मगन भगवान बाबर यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने बाबर कुटुंबीयांसह वडशिंगे व पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

मगन भगवान बाबर यांनी आपल्या आयुष्यात सामाजिक बांधिलकीला विशेष महत्त्व दिले. या पंचक्रोशीतील हजारो मुलींची लग्ने जमवून त्यांचे संसार उभे करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. विवाह जुळविण्याचे काम त्यांनी केवळ एक व्यवहार म्हणून केले नाही, तर अनेक कुटुंबांना एकत्र आणण्याचे आणि नव्या नात्यांची वीण घट्ट करण्याचे सामाजिक कार्य म्हणून केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे हजारो मुलींच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली, तर अनेक कुटुंबांच्या घरात आनंदाचे क्षण फुलले.

त्यांनी जोडलेली नाती, जुळवून आणलेली कुटुंबे आणि त्यांच्या माध्यमातून निर्माण झालेला माणसांचा गोतावळा हीच त्यांच्या आयुष्यभराच्या कार्याची खरी ओळख ठरली. त्यांच्या कार्याची आठवण आजही अनेक कुटुंबांच्या मनात कायम राहील.

याविषयी त्यांचे पुत्र कल्याण मगन बाबर म्हणाले की, "माझ्या वडिलांनी या पंचक्रोशीतील हजारो मुलींची लग्ने जमवून त्यांचे संसार थाटले. अनेक कुटुंबांना आनंदाने एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले. आज ते आमच्यात नसले तरी त्यांनी दिलेले संस्कार, माया आणि सामाजिक कायार्चा वारसा आम्ही कायम जपणार आहोत."

कुटुंबासाठी मगन बाबर हे प्रेमळ वडील, जिव्हाळ्याचे भाऊ आणि सर्वांना आधार देणारे कुटुंबप्रमुख होते. त्यांच्या कष्टातून आणि संस्कारांतून कुटुंबाला जीवनाची दिशा मिळाली. त्यांच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या आठवणींची शिदोरी मात्र सदैव सोबत राहणार आहे.

एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर तिचे अस्तित्व संपत असले, तरी तिने जोडलेली माणसे आणि केलेले कार्य कधीच संपत नाही. हजारो मुलींचे संसार थाटण्यात हातभार लावणारे मगन भगवान बाबर यांच्या सामाजिक योगदानाची आठवण पंचक्रोशीतील कुटुंबांच्या मनात कायम जिवंत राहील.

भावपूर्ण श्रद्धांजली !

अभिवादक : बाबर शेती फार्म, वडशिंगे, ता. माढा, जि. सोलापूर.



संपादकीय

कोट्यवधींच्या योजना, तरीही तहानलेला महाराष्ट्र!

दुष्काळाच्या संकटातून निसर्ग काही सांगत आहे... त्या सांगण्याकडे लक्षपूर्वक पाहायचं, तर इतकी वर्ष आपण सगळ्यांनीच स्वतःला बधीर करून घेतले आहे. दुष्काळ आपोआप येत नाही, तसाच आपोआप परत जात नाही.

त्याचे विविध अवतार दुष्काळ वास्तवाचे दर्शन घडवत असतात. अजिबात पाऊस नसलेले अनेक प्रांत आहेत, उंच पर्वत पठारावर पाऊस नाही पडला तर एकही थेंब माथ्यावर राहत नाही, त्यानंतर कित्येक दशके पाऊस येईल की नाही माहित नसते तरी त्या वैरणात माणसे राहत आले आहेत. शेकडो किमी लांब लांब नुसती वाळू, माती, रेती उडणारी मैदाने, वाळवंट आहेत की तिकडे पाऊस कधी आला होता हेच माणसांना, झाडांना, प्राण्यांना आठवत नसेल पण सर्व सजीव आपापल्या दिनचर्या बदलवून, टिकून राहत आले आहेत. पाऊस पाणी आणि सजीवाची दिनचर्या यांचे नाते कसे घट्ट जैव अतूट आहे. पण मग दुष्काळ ही काय भानगड झाली आहे की माणूस प्राणी या दिनचर्येचा सरधोपट ठोकळा होऊन राहायला लागला आहे.

प्रदीर्घ अनुभवाच्या प्रवाहातून खरे तर माणसाने, त्याच्या समूहाने इतक्या वर्षात शहाणपणाच्या बाबतीत परिपूर्ण व्हायला पाहिजे. पाऊस आला नाही तरी प्रत्येकाच्या पाण्याची तरतूद झाली आहे दुष्काळ संकटात खंबीर राहायला पाहिजे. माणसाकडे असलेले शास्त्रीय ज्ञान अंमलात आणून किमान दोन वर्षासाठी लागणारे पाणी शांतपणे राखून ठेवून त्याचा विनियोग केला पाहिजे. परंतु माणसाने माणसाच्या हजारो वर्षाच्या ज्ञान संचिताला लाथाडले आहे. नवीन सहस्त्रकात प्रवेश करून पंचवीस वर्ष उलटून गेली. या पाव शतकात किमान सहा वेळा तरी दुष्काळ किंवा टंचाई परिस्थिती डोक्यावर आदळली आहे. जवळपास दर तीन चार वर्षात पाऊस गायब होतो, नद्या, विहिरी कोरड्या ठक्क पडतात. दुष्काळातील वर्षात एकजात सगळेच्या सगळे पूर्वीच्या ज्ञानाचा उपयोग न करता डोक्याला कशाला शॉट म्हणत अजून नवीन भन्नाट पाणी पुरवठा योजना आखायला लागतात. सध्या इकडचे पाणी कमी झाले काय, मग चला आणखी शंभर किलोमीटरवरून पाणी उचलून आणू. एका एका शहरासाठी, गावांसाठी शेकडो योजना कागदावर तयार करून त्याच्या आरती गायल्या जात आहेत. एवढे केले की झाले पुढे दररोज चोवीस तास पाणीच पाणी अशा वल्गना, थापा, प्रत्येक तालुक्यातून दरवर्षी सुरू आहेत.

केंद्र आणि राज्याच्या पाणी पुरवठा, पेयजल योजना मग त्याला नाव काहीही असो त्या पूर्ण करायला पाच-दहा वर्षे घालवली जात आहेत. महाराष्ट्रातील पाणी प्रश्न कायमचा मिटवण्यासाठी कोकणातले समुद्रात वाहून जाणारे पाणी उलट दिशेला वळवण्याचा योजनांचा अंदाजित खर्च आत्ताच लाख कोटीच्या पलीकडे आहे. यापूर्वी उजनी व इतर धरणांचे खर्च कसे वाढत गेले हे संबंध राज्यांनी पाहिले आहे. मागच्या सरकारचा सिंचन घोटाळा चर्चेत आणून तेंव्हाच्या विरोधी पक्षांनी सत्ता मिळवली आहे हेही सगळ्यांना माहित आहे. कोकणच्या पाण्याशिवाय पर्याय नाही असे एका एका टोकाला आणि नदी जोडण्याशिवाय पाणी साठणार नाही हे दुसऱ्या टोकाला सांगत राहून संपूर्ण राज्यात पाण्याचा संबंधातील दुष्काळ हा कोट्यावधी रुपयांच्या योजना शिवाय संपणार नाही या निर्णयावर महाराष्ट्र आणून ठेवला आहे. मराठवाड्यासाठी वॉटर ग्रीड योजना नुकतीच मंजूर झाली, त्याचा अंदाजे खर्च वीस हजार कोटी रुपये आहे, त्यासाठी जागतिक बँकेचे कर्ज घेतले जाणार आहे. कोकणातील पाण्यासाठी एक लाख कोटी खर्च येणार आहे, त्यासाठी जागतिक बँक आणि परदेशी गुंतवणूकदार पैसे देणार आहेत. अशा योजना मोठ्या आकारात वाढवून विस्तारून दाखवल्या जातात. त्याशिवाय इतर पयार्यी मागार्चा विचार मारला जातो. कोकणातले पाणी हे कायम स्वरूपी हवे तितके वाहते राहणार आहे अशी कल्पना कशाच्या जोरावर मांडली जात असेल ?

या शतकाच्या पहिल्या पाच वर्षात मोठ्या धरणात साठलेला गाळ ही समस्या पाणी टंचाईला कारण असल्याचे सांगण्यात येत असे. मग धरणातील गाळ काढायला पाहिजे असे जर कोणी म्हणताच इंजिनियर मंडळी सांगत असत की तो काढण्याच्या खर्चात दुसरे धरण बांधून होईल. त्यामुळे गाळ काढण्याच्या कल्पना स्वप्नाळू आहेत. त्यानंतर काही वर्ष गाळ हा मुख्य चर्चेत आला. रोजगार हमीतून गाळ काढावा, इथपासून ते लोकांनी स्वतःच गाळ काढून न्यावा असे हो नाही करत सगळीकडे गाळ काढण्याचे यंत्र फिरताना दिसू लागले. लहान मोठ्या बंधाऱ्यातून गाळ उचलला चालला. नवीन सरकारने तर अधिकृत धोरणच आणले की जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण म्हणजे गाळ काढून शिवारात पाणी खेळले जाणार, मातीमध्ये ओलसरपणा टिकून राहून सिंचनाला मदत होणार, जलयुक्त शिवार ही संकल्पना अत्यंत चांगली आहे, फक्त ती व्यापक, परिपूर्ण होण्यासाठी काय करायला हवे त्याचा अभ्यास झाला नाही. अतिघाईत टेंडर्स काढणे त्यातील तांत्रिक भौगोलिक तपशील न पाहता कामे पूर्ण करणे. अशा चुकांमुळे जलयुक्त मधून काही हाती लागले नाही. याच कामासाठी पूर्वी पाटबंधारे आणि लघु पाटबंधारे असे नवे असायचे. या नावात काही उद्देश अभिप्रेत आहेत. पाणी वाहते ठेवणे, पाणी मुरवून जमीन राखणे, पाणी साठवणे, पाणी वाहून, उचलून अन्य ठिकाणी घेऊन जाणे, पिण्यासाठी पाणी उपलब्ध करणे, शेती आणि उद्योगांसाठी पाणी उपलब्ध करणे या सर्व उद्देशाने पाटबंधारे योजनांचा विचार केला जातो. त्या ठिकाणी जलसंपदा आणि जलसंधारण ही नावे लावण्यात आली. जाणीवपूर्वक नांवे बदलून मूळ कार्यपद्धतीला बाजूला केले की ध्येय, उद्देश, हेतू यामध्ये अंतर वाढत जाते, संबंधीत योजना व प्रकल्पाचा बोजवारा उडतो. त्यामध्ये नेमके काय बिनसले यावर पुनर्विलोकन केले जात नाही, अहवाल, तपशील यांचे अभिलेखे राखले जात नाहीत. लिखित नोंदी परिपूर्ण नसण्यातून पाणी विषयक समस्या अधिक गंभीर व्हायला लागतात.

मागील पंचवीस वर्षात सहा सात वेळा दुष्काळ पडला आहे. त्याच्यावर उपाय करण्याच्या पद्धती मात्र तशाच राहिल्या आहेत. दुष्काळावर मात करायची आहे यापेक्षा आम्ही दुष्काळावर कसे भारी काम करत आहोत याचे प्रदर्शन करण्यासाठी जास्त धडपड चालताना दिसते. कांही आकर्षक नाव धारण करणे, तसेच आकर्षक अशा घटकांना प्रसिद्धी मिळवून देण्यात जास्त उत्साह दिसायला लागतो. असाच एक प्रकार लोकसहभाग या नावाने चालतो. लोकसहभाग म्हणजे नेमके काय याबद्दल काहीही आखीव रेखीव ठरलेले नाही.

पाणी योजनांच्या बाबतीत लोकवाटा घेतला जातो, म्हणजे एकूण खर्चाच्या दहा टक्के रक्कम संबंधित गावाने भरायची आहे. असे करण्याचे कारण काय, तर लोकांचा सहभाग आवश्यक अशी बतावणी मागील पंचवीस वर्षात पसरवण्यात आली. लोकवाटा आणि लोकसहभाग या दोन्ही शब्दांचा मारा ग्रामीण जनतेवर सतत केला जात आहे. लोकांना त्याबद्दल आस्था वाटणे, त्यांची मानसिक आर्थिक क्षमता तयार होणे याबद्दल कसलीच सामाजिक धडपड गावातून तयार झालेली नसते. आधी जसे लोक शासनावर पूर्णता अवलंबून आहेत तसेच आत्ताही आहेत.कोणता तरी नवीन कागद मागून सरकारी काम अडून बसते तसेच शासकीय पाणी योजना होण्यासाठी लोकसहभाग लोकवाटा मागितला जातो. आधीच गावात दुष्काळाशी सामना करणारे, सरकारी यंत्रणाबरोबर संपर्क नसलेले लोक स्वतःहून कसा सहभाग देणार आहेत? त्यासाठी गावातीलच मोठ्या ताकदीच्या व्यक्ती लोकांच्या वतीने हा सहभाग द्यायला पुढाकार घेतात, कारण त्या व्यक्तीला स्वतःचे राजकीय नेतृत्व राजकीय लाभ कायम राखायचे असतात. त्यांनीच प्रयत्नपूर्वक योजना मंजूर करवून आणलेली असते, निधी मंजूर करण्यास मुंबईकडे फेरे घेतलेले असतात, खर्च केलेला असतो. लोकवाटा रक्कम भरपाई याच व्यक्ती करतात. एवढे करून जर योजना फसली तर त्याचा फटका लोकांना बसणार असतो. कारण दुसरी योजना पुन्हा त्याच चक्रातून जाणार असते. पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत तर हे दुर्दैव जवळपास प्रत्येक गावात वाढत आहे. गंमत म्हणजे नव्या येणाऱ्या महाकाय कोकण/वॉटर ग्रीडसाठी मात्र लोकसहभाग अत्यावश्यक केलेला नसतो. इतकेच काय योजना परिक्षेत्रातील गावांच्या पंचायतींना त्यात काहीच किंमत नसते. पण लहान कामे लहान पाणी योजनांसाठी मात्र लोकांच्या डोक्यावर ओझे टाकण्यात येते.

गावातील लोकांना पिण्यासाठी, शेतीसाठी, जनावरांसाठी पाणी लागत असते. त्याच्या नंतर बांधकाम करण्यास पाणी लागते. या चार गरजांसाठी पाण्याचा सविस्तर अभ्यास करण्यास गावकरी लोक कुठेही तयार झालेले दिसत नाहीत. अण्णा हजारे यांचे राळेगण सिद्धी आणि पोपट पवार यांचे हिवरे बाजार या दोन जवळपास अपवादात्मक उदाहरणावरून लोकांचा सहभाग महाराष्ट्र राज्यात चचेर्ला आला आहे. त्याचे अनुकरण करण्यासाठी सरकारी यंत्रणांनी भरपूर प्रयत्न केले. त्याची प्रसिद्धी केली, अभ्यास सहली काढल्या, महिला मंडळे बचत गट, ग्राम पंचायत सदस्य, अभियंते, इत्यादींना ही गावे दाखवण्यात आली. पाणी नियोजन कसे महत्वाचे आहे त्यात अंमलबजावणी साठी काय पावले घ्यावी लागतात याचा अभ्यास महत्वाचा आहे. पण त्या ऐवजी बहुतांश सहलवादी प्रसिद्धी करण्यास उतावीळ असणाऱ्या सरकारी यंत्रणांनी पुढे आदर्श गाव, गावाचा विकास, मध्येच शाश्वत विकास , मध्येच बचत गटांचे उद्देश अशा इतर कारणासाठी सहली काढल्या. पण जलसंधारण प्रयोगांचे अनुकरण इतर ठिकाणी झाले नाही. संपूर्ण गाव शेती पाणी बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याचे कुठे दिसत नाही. परंतु उत्साही लोकसहभागाच्या प्रसिद्धीतून डोंगर माथा ते पायथा ही कल्पना, आडवे चर खोदणे, विशिष्ट आकाराचे खड्डे खोदणे, तलावाच्या आसपास खड्डे करणे, त्यातील माती भरावावर आणून त्याची क्षमता वाढवणे, नाला ओढ्यातून माती अडकली आहे त्याठिकाणी नाला सरळ, खोल करणे अशा कामाची उठवळ वाढवली गेली. भोवतीचा निसर्ग, पर्यावरण, भौगोलिक वास्तव अभ्यास, न करता अशी चटकन नजरेत भरणाऱ्या कामांचा गवगवा करण्यात आला.

या संस्थांनी आडवे चर, शोष खड्डे, नाला सरळीकरण कामासाठी पुढाकार घेतला. त्यांनी केलेल्या कामाच्या नंतर लगेच पावसाळा आला आणि त्यावर्षी पाऊसमान साधारण राहिले, म्हणजे कमी झाले नाही, परिणामी या संस्थांनी केलेल्या खड्ड्यांच्या ठिकाणी पाणी साठलेले दिसले, नाला सरळ केल्याने लांबवर साठलेल्या पाण्याची छायाचित्र प्रसिद्ध झाली. लोकसहभागाच्या यशकथा सर्वत्र प्रसिद्ध झाल्या. अशा कामासाठी यासाठी शासनाचे स्वतंत्र विभाग आहेत. वषार्नुवर्षे त्यांच्याकडून लहान, मध्यम पाझर तलाव, माती नाला बांध, सिमेंट बंधारे बांधले जात आहेत. त्यांच्याकडून सुद्धा पाणी साठून पाझरले जातच आहे. पण त्यांच्या कामात गावकरी सहभाग घेत नाहीत. त्यासाठी गावात सरकारी अधिकारी आले तर लोकांनी अनेक गावातून वाकडे पाऊल उचलले आहे. तसेच एखादी सामाजिक संस्था पाणी विषयात काम करत असेल तर त्याला सरकारी यंत्रणा, गावकरी फार उत्साहाने मदतीला आले नाहीत. पण चित्रपट क्षेत्रातील लोकप्रिय चेहरे आले की परिस्थिती बदलते.

एरवी कुठेही बाहेर न पडणारे सुखवस्तू तरुण-तरुणी कुदळ खोरे, टोपले घेण्यास सहभागी होतात. गावातील म्होरके बॅनर, स्टिकर, टोप्या घालून टीशर्ट घालून पुढे येतात. सर्व सरकारी यंत्रणा कामाला लागतात, अगदी मंत्रालयातून आणि मुख्यमंत्री महोदयाकडून याबद्दल सूचना निघतात. संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शनिवार हा सुट्टीचा वार लोकसहभाग म्हणून जाहीर करतात. सर्व खात्यांचे अधिकारी, कर्मचारी सकाळी सात पासून अकरा वाजेपर्यंत श्रमदान करतात. या कामांच्या बातम्या होतात. पण त्या गावाच्या परिसरात किती चौरस किलोमीटरमध्ये कोणत्या काळात किती तास, किती मिलीमीटर पाऊस पडल्यावर तीन कोटी लिटर पाणी मिळणार आहे याचे गणित त्यांना सांगता येत नाही. खड्डे खोदल्याचा परिणाम नक्की काय झाला याचे मूल्यमापन करायला परत माननीय जिल्हाधिकारी जात नाहीत. त्या गावातील लोक आपल्या विहिरी ओढे नाले यातील पाण्याचे मोजमाप करत नाहीत.

महत्वाचा मुद्दा असा, या संस्थांच्या कामाचा परिणाम मोजला जात नाही. खड्ड्यातून साचलेले पाणी नेमके कसे वापरयाचे, त्याचा शास्त्रीय अर्थ काय लावायचा याबदल पुढचा धडा संबंधित संस्थांकडून, सरकारकडून शिकवला जात नाही. यातून विपरीत घडते की पाणी टंचाई आणि दुष्काळ निवारण यासाठी फक्त खड्डे खोदणे, चर काढणे, त्यासाठी छापील टीशर्ट टोप्या घालून सरकारी हौशी यंत्रणा वापरून गवगवा करणे असे होऊन बसले आहे.

आत्ता अलीकडे ऑक्टोबर महिन्यात सांगली जिल्ह्यातील बातमी प्रसिद्ध झाली. पंधरा ऑक्टोबर रोजी एकाच दिवशी पाचशे वनराई बंधारे बांधण्यात आले. याचे फोटो प्रसिद्ध झाले. वाळू माती भरलेले पोत्यांच्या थप्पी ओढ्याच्या पात्रात लावून अधिकारी कर्मचाऱ्यांनी बंधारा तयार केला. प्रसिद्ध झालेल्या फोटोत ओढ्याच्या दोन्ही दिशेला अगदी एक इंच देखील पाणी वाहताना दिसत नाही, संपूर्ण पात्र अक्षरशः कोरडे आहे. तेथे वनराई बंधारा हौसेने श्रमदान केले त्यांच्या कष्टाला कमी लेखण्याचा हा उद्देश नाही पण वनराई बंधारा म्हणजे नक्की काय, कुठे बांधायचा असतो याबद्दल अज्ञान अनास्था असेल तर की उद्देशाचे मुसळ केरात अन श्रमाची वाळू पोत्यात जाऊन अडकते !! त्या ओढ्याच्या आसपास लपून पाहत असणारा 'दुष्काळ' या निवारण कार्याकडे बघत खदखदून हसला असेल.

साधारणतः पावसाचा हंगाम हा सप्टेंबरपर्यंत राहतो. मोठाले पाऊस, पाऊस पडणे थांबले की जोरात वाहणारे पाणी निघून जाऊन हळूहळू वाहणारे पाणी ठिकठिकाणी दिसायला लागते. त्या पाण्याला तग धरण्यासाठी वनराई बंधारा बांधला जातो. वनराई या शब्दाचा अर्थ खूप सुंदर आहे, वनामध्ये झाडा झुडपांच्या मधून वाहणारे, ठिकठिकाणी अडवणे खेळवणे यासाठी त्याच परिसरात असलेल्या वस्तू, दगड, माती, वाळू, लाकडे, पाचोळा इत्यादी वापरून अगदी लहान उंचीचा बांध घालणे याला वनराई बंधारा म्हणतात. पण यावर्षी जुलै महिन्याच्या नंतर अजिबातच पाऊस पडला नाही. कुठेच नदी नाले टच्च भरून वाहिले नाहीत तर असे झुळझुळू पाणी कुठून वाहणार आहे, आता पावसाळा पूर्णतः संपला असताना नाल्यातून पाणीच नसताना वनराई बंधारा म्हणजे बिनकामाची हौस भागवणे आहे.

केवळ शासकीय परिपत्रकांचे आदेश आंधळेपणाने पाळत राहण्यातून असे प्रकार घडत आहेत. पंधरा ऑक्टोबर पासून अशी वनराई बंधारा कामे करावीत असे पत्रकात नमूद असते. पंधरा तारीख लक्षात ठेवून सांगली जिल्ह्यातील सरकारी लोक प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडून रिकामे झाले. याचा अर्थ इतकाच की उत्साही अधिकारी, कर्मचारी यांनीही मागील काळात दुष्काळाच्या वेगवेगळ्या वर्षी त्यांनी स्वतः जंगलात जाऊन, ओढे नाले पाहून पाणी विषयक ज्ञान घेतले नाही. ओढ्याच्या पात्रात नदीमध्ये आपल्या परिसरात वाळू, खडी, गारगोट्या शंख शिंपले, वेगवेगळे गवत, वेली अशा बारीकसारीक नैसर्गिक वास्तवाचा कधी अंदाज घेतलाच नाही. चर्चेत असलेल्या संस्थांच्या कौतुकातून टंचाई आणि दुष्काळ हाताळले जात आहेत. अशा हौशी कामाचे ढोल वाजवणे आणि त्याच्या अगदी विरुद्ध म्हणजे कायम पाणी मिळवण्याच्या अफाट कल्पना, शेकडो किलोमीटर पाणी उचलून ट्रान्सपोर्ट करून नेण्याच्या अचाट अजस्त्र योजनांचे नगारे वाजवण्याने दुष्काळ अनेक वर्ष ठाण मांडून बसणार आहे.

सोलापूरात शेतकऱ्यांचा ठिय्या

तोडगा निघेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा आंदोलकांचा निर्धार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गाळप हंगाम सुरू होऊन महिना उलटूनही ऊसदर जाहीर न झाल्याने सोमवारी दहा हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त भेदून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात धडक दिली.

प्रतिटन ३,५०० रुपये पहिली उचल आणि ७०-३० सूत्रानुसार वाढीव दर जाहीर होत नाही, तोपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार करत आंदोलकांनी रात्री उशिरापर्यंत कार्यालय परिसरात ठिय्या आंदोलन सुरूच ठेवले. जिल्हाधिकाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत कारखानदारांशी संपर्क साधून घेतलेल्या बैठका निष्फळ ठरल्याने संतप्त आंदोलकांच्या जोरदार घोषणाबाजीने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

अंधाराचे साम्राज्य आणि रस्त्यावरच पंगती

कारखानदारांकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, समोरील रस्ता आणि लगतच्या इमारतींच्या अवतीभोवती जागा मिळेल तिथे बसून मुक्काम ठोकला. रात्री उशिरापर्यंत तिथेच जेवणाच्या पंगती उठल्याचे चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोरील रस्त्यावरील खांबांवरील पथदिवे व परिसरातील वीज पुरवठा बंद असल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. महापालिका प्रशासनाने वीज पुरवठा जाणीवपूर्वक बंद ठेवल्याचा आरोप शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केला.



'शेतकरी थंडीत रस्त्यावर, नेते सत्तेच्या उबेत' - पदाधिकाऱ्यांची टीका

आंदोलनस्थळी उपस्थित शेतकऱ्यांनी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीवर तीव्र संताप व्यक्त केला. 'शेतकऱ्यांना ऊसदराची चिंता सतावत असताना जिल्ह्यातील नेतेमंडळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे राजकीय डावपेच टाकण्यात मश्गूल आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत बहुतांश कारखानदारांसह त्यांचे समर्थक आणि नेतेमंडळी सक्रिय आहेत. पालकमंत्र्यांनाही शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत गांभीर्य नाही. शेतकरी दरासाठी कडाक्याच्या थंडीत रस्त्यावर बसून आहेत, तर नेतेमंडळी सत्तेची ऊब मिळवण्यासाठी धडपडत आहेत,' अशी टीका शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

कारखानदारांची संघटित गुन्हेगारी; राजू शेट्टी

आवारातील ट्रॅक्टर ट्रॉलीवरून मार्गदर्शन करताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी कारखानदारांवर तीव्र हल्लाबोल केला. ते म्हणाले की, 'सोलापूरचे कारखानदार दरोडेखोर आहेत. पावसाळ्यात नदी भरून वहात असताना वीज पुरवठा बंद ठेवला. त्यानंतर धरणातील पाणी कर्नाटकात सोडून दिले. पण, जिल्ह्यातील तलाव भरून घेतला नाही. शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळू न दिल्याने ऊस वाळला, शेतकऱ्यांना ऊस तोडायला भाग पाडले; ही कारखानदारांची एकजुटीने केलेली संघटित गुन्हेगारी आहे. शेतकऱ्यांकडून कमी दरात ऊस घेऊन आणि तो कमी दरात साखर विकून कारखानदारांनी स्वतःचा लाभ साधला. साखर उद्योगात खोडा घालण्याचे आणि बाजारपेठेत अडचणी निर्माण करण्याचे काम सोलापूरच्या कारखानदारांनी केले आहे. साखरेचे भाव वाढले असते तर शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला असता; मात्र येथील कारखानदारांनी साखर उद्योग आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. देशातील ३० लाख टन साखरेचा हिशेब केंद्रीय सहकार मंत्र्यांना द्यावा लागेल.'

शेतकऱ्यांना आवाहन करताना शेट्टी पुढे म्हणाले की, 'मी तुमच्याबद्दल नाराज होतो, पण तुमचा आक्रोश पाहून तुमच्यासाठी पुन्हा आलो आहे. डोक्यातील सर्व जळमटे काढून टाका; मी या पक्षाचा, त्या गटाचा किंवा जातीचा हे सोडून द्या, सगळा शेतकरी एकच आहे. जोपर्यंत तुम्ही एक होत नाही, तोपर्यंत कोणी काही वाकडे करणार नाही. शेजारील जिल्ह्यांत आणि कर्नाटकात ३,४०० ते ४,२०० रुपये दर मिळत असताना सोलापुरातील कारखानदार केवळ तीन हजार रुपये देऊन लूट करत आहेत. तुमचा सगळा ऊस गाळप करण्याची जबाबदारी मी घेतो, फक्त तुम्ही खंबीर राहा. जिल्हाधिकारी आणि पोलिसांनी यामध्ये पडू नये, दर कसा काढायचा हे आम्ही पाहतो. आठवडा झाला आहे, प्रश्न लवकर मिटवा अन्यथा तीव्र रास्ता रोको करू.'

सरकार सत्तेवरून खाली खेचू : महादेव जानकर...

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी राज्य शासनावर टीकास्त्र सोडले. 'कारखानदार चोर असून राज्य शासन त्यांना पाठीशी घालत आहे. हे सरकार आम्ही सत्तेवर आणले, आता आम्हीच त्यांना सत्तेवरून खाली खेचू,' असा इशारा जानकर यांनी दिला. या आंदोलनात प्रा. सुहास पाटील, विजय रणदिवे, दीपक भोसले, प्रभाकर देशमुख, संजय कोकाटे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पान १ वरून

'मफलर मॅन' म्हणून रोहित पवारांनी दाखवला...

उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो दाखवला.

तसेच व्हीएसआर कंपनीचे मालक आणि व्ही. के. सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त केला. मात्र, या प्रकरणात कोणाचा घातपाताचा हात असल्याचे आपण म्हणत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

रोहित पवार म्हणाले, "दादांच्या अपघातामागचे सत्य काय आहे, हे अद्याप समोर आलेले नाही. ते समजावे, असे आपल्या सर्वांनाच वाटते. हा अपघात होता की घातपात, हा प्रश्न सर्वांना पडला आहे. त्याचे उत्तर शोधण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे."

या प्रकरणात काही प्रामाणिक व्यक्तींकडून आपल्यापर्यंत माहिती पोहोचवली जात आहे. आतापर्यंत मिळालेली माहिती आपण पत्रकार परिषदांच्या माध्यमातून जनतेसमोर मांडली आहे. माहिती देणाऱ्या व्यक्तींनाही आपली ओळख उघड होण्याची आणि त्यांच्यावर कारवाई होण्याची भीती आहे. मात्र, त्यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी माहिती देण्याची भूमिका कायम ठेवल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

या प्रकरणात संबंधित व्यक्तीने घातपात केला, असे आपण म्हणत नसल्याचे स्पष्ट करत रोहित पवार म्हणाले की, व्हीएसआर कंपनीला वाचवण्यासाठी या व्यक्तीचा हात असल्याचा आम्हाला संशय आहे. व्ही. के. सिंग आणि व्हीएसआर कंपनीला महाराष्ट्रातील एका बड्या नेत्याचे संरक्षण मिळत असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली.

व्ही. के. सिंग यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याचा दावा करत, व्हीएसआर कंपनी आणि व्ही. के. सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही रोहित पवार यांनी केला.

व्ही. के. सिंग यांच्या जयपूर येथे झालेल्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते, असा दावा रोहित पवार यांनी केला. या पार्श्वभूमीवर व्हीएसआर कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांकडून होत असल्याचा आरोप त्यांनी केला. या आरोपांमध्ये तथ्य नसेल, तर सरकारने याची चौकशी करावी, असे आव्हानही त्यांनी दिले.

"या सरकारने व्ही. के. सिंग आणि त्यांच्या कंपनीला वाचवण्याचा प्रयत्न केला असला, तरी आमचे सरकार आल्यावर त्यांना सोडणार नाही. हा पुतण्या कुणालाही सोडणार नाही," असा इशाराही रोहित पवार यांनी दिला.

अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या तपासाबाबत रोहित पवार यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरील आरोपांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. या आरोपांबाबत संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया किंवा तपासातून निष्कर्ष समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की तो घातपात आहे यावर अद्यापही चर्चा सुरू आहेत. रोहित पवार यांनी हा मुद्दा लावून धरला आहे. यासाठी त्यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये अनेक नेत्यांच्या भेटी घेतल्या, पत्रकार परिषद घेतल्या. सोमवारी देखील रोहित पवार यांनी एक पत्रकार परिषद घेत व्ही के सिंग आणि व्हीएसआर कंपनीला वाचवणारा हा महाराष्ट्रातील एक मोठा नेता आहे असं आमचं ठाम मत असल्याचा उल्लेख केला आहे. या पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार यांनी 'राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय हवाई मंत्री यांचे व्ही के सिंग यांचे घनिष्ट संबंध असतील तर दादांना न्याय मिळणार कसा?' असा थेट सवाल केला आहे.

काही दिवसांपूर्वी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या बाहेर महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताशी संबंधित एक पोस्टर लागले होते. या पोस्टरवर मफलरचा फोटो होता व या अपघाताला जबाबदार लोकांना वाचवणारा नेता कोण असा प्रश्न केला होता. त्या फोटोचा खुलासा रोहित पवार यांनी आजच्या पत्रकार परिषदेत केला. रोहित पवार यांनी 2024 ला व्हीके सिंग यांचा मुलगा रोहित सिंग याच्या लग्नातला देवेंद्र फडणवीस यांचा फोटो दाखवला आहे.

हिंमत असेल तर व्हीके सिंगवर कारवाई करा

रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो शेअर केल्यानंतर 'हिंमत असेल तर व्हीके सिंग यांच्यावर कारवाई करा', असे आव्हान केले आहे. 'राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय हवाई मंत्री यांचे व्ही के सिंग यांचे घनिष्ट संबंध असतील तर दादांना न्याय मिळणार कसा? अशा परिस्थितीत दादांना न्याय मिळेल असं मला तरी वाटत नाही. 2029 पर्यंत आम्ही वाट बघू. यात मुख्यमंत्र्यांचं काहीही घेणं देणं नसेल आणि हिंमत असेल तर व्हीएसआरवर कारवाई करून व्हीके सिंगला तुरुंगात टाकावे', असे आव्हान रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिले.

व्हीके सिंग यांचे 18 कोटींचे घर ?

अजित पवार यांच्या मृत्यूनंतर दोन दिवसातच व्हीके सिंग यांच्या कुटुंबीयांनी अमेरिकेतील फ्लोरिडा येथे 18 कोटींचे घर विकत घेतले. हे घर त्यांनी कोडॅक ब्लॅक या रॅपरकडून विकत घेतले आहे. या कोडॅक ब्लॅकवर अमेरिकेत बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगणे, ड्रग्जची तस्करी करणं, दरोडा, अपहरण असे आरोप आहेत. तसेच रोनेल लुईमा या ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांसोबत व्हीके सिंग यांचे मुलगे राहुल व रोहित सिंग यांच्यासोबत संबंध आहेत.

विमानातून करतात सोन्याची तस्करी ?

रोहित पवार यांनी व्हीएसआर कंपनीच्या विमानाचा फोटो शेअर करत त्यासोबत राहुल सिंग यांच्या एका चॅटचा फोटो देखील शेअर केला आहे. या व्हॉट्सॲप चॅटमध्ये राहुल सिंग हा सदर विमानातून दीड टन सोनं नेता येऊ शकते का? असा सवाल केला आहे.

आम्ही अजितदादांना मारलंय, तुम्ही तर किरकोळ लोक आहात!...

अजितदादांच्या अपघाताशी काही संबंध आहे का ?

'आम्ही अजितदादा पवार यांना मारलं आहे,' असे धमकीत म्हटल्याचा दावा साधा किंवा दुर्लक्ष करण्यासारखा नाही. या विधानामागे नेमका काय संदर्भ आहे? संबंधित महिलेने हे शब्द कोणत्या आधारावर वापरले? तिचा राणा सूर्यवंशी यांच्याशी नेमका काय संबंध आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलिसांनी शोधली पाहिजेत, अशी मागणी रोहित पवार यांनी केली.

राणा सूर्यवंशी प्रकरण आणि अजित पवार यांच्या अपघाताचा काही संबंध आहे का, याबाबत संशय निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे केवळ संशयावर न थांबता संबंधित व्यक्तींचे संपर्क, व्यवहार, धमकीमागील पार्श्वभूमी आणि उपलब्ध पुरावे यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

धमकी खरी की दबावाचे राजकारण? आरोपांची सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार!

एखादी व्यक्ती कितीही प्रभावशाली असली तरी कायद्यापेक्षा मोठी असू शकत नाही. धमकी देण्यात आली असेल, खोट्या तक्रारी दाखल करण्यासाठी दबाव आणला असेल किंवा खंडणी उकळण्याचा प्रयत्न झाला असेल, तर संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचवेळी अजित पवार यांच्या अपघाताशी संबंधित असल्याचा संशय व्यक्त केला ज

1 ते 10 नोव्हेंबर दरम्यानचे रू.3150/-प्रमाणे बील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा - बबनराव शिंदे

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब कारखान्याचा सन 2026-2027 चा गाळप हंगाम सुरू झालेला असून या हंगामात दि.01 ते 10 नोव्हेंबर दरम्यान गाळपास आलेल्या ऊसासाठी ॲडव्हान्स हप्ता प्रती टन 3150 रुपए प्रमाणे ऊस बिल शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करणेत आला आहे अशी माहीती कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे यांनी दिली.



अधिक माहीती देताना संस्थापक चेअरमन बबनराव शिंदे म्हणाले, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब या कारखान्याचा सन 2026-27 चा गाळप हंगाम दि.15 ऑक्टोबर पासून सुरू झालेला आहे. आजअखेर युनिट नं.1 कडे 3 लाख 96 हजार 183 मे.टन व युनिट नं.2 कडे 1 लाख 38 हजार 482 मे.टन असे एकूण 5 लाख 34 हजार 665 मे.टन गाळप झालेले आहे.


या हंगामात दोन्ही युनिटकडे दि.01 ते 10 नोव्हेंबर या कालावधीत गाळपास आलेल्या ऊसाचे जाहीर केलेनुसार प्रती टन रू.3150/- प्रमाणे ॲडव्हान्स ऊस बिल सभासद,बिगरसभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करणेत आले आहे. त्यासाठी कारखान्याने 52 कोटी 49 अदा केले असून आजअखेर ऊस बिलासाठी एकूण 137 कोटी 59 लाख अदा केले आहेत. कारखान्याने 10 दिवसाला ऊस बिल अदा करणेची परंपरा या हंगामात देखील कायम राखलेली आहे अशी माहीती संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

कारखान्याची ऊस व तोडणी वाहतूक बिले वेळेत मिळत असल्याने अनेक शेतकरी व वाहनमालक त्यांचा ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्यास देण्यास प्राधान्य देत आहेत. सन 2026-27 गळीत हंगामामध्येही ऊस पुरवठादारांनी त्यांचा ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्यास पुरवठा करून हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मा.आ.शिंदे यांनी केले.

सदरप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन पोपटभाऊ गायकवाड. कार्यकारी संचालक एस.एन.डिग्रजे, युनिट नं.2 चे जनरल मॅनेजर पी.एस.येलपले व इतर खातेप्रमुख उपस्थित होते.

विठ्ठलवाडी गावच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबध्द : चेअरमन रणजितसिंह शिंदे

माढा (कटूसत्य वृत्त):- मागील अनेक वर्षांपासून माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या प्रयत्नातून विठ्ठलवाडी गावातील अनेक महत्त्वाचे प्रश्न व समस्या मार्गी लावल्या आहेत.गावातील उर्वरित पाणंद रस्ते,वीज समस्या,सीना-माढा उपसासिंचन योजनेचे पाणी माळावरील मोठ्या पाझर तलावात सोडणे,शेतकऱ्यांच्या ऊसाचे गाळप करणे आदी प्रश्न प्राधान्याने सोडविणार असून टप्प्याटप्प्याने गावच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबध्द असल्याचे प्रतिपादन जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी केले आहे. ते विठ्ठलवाडी ता.माढा येथे सदिच्छा भेटीच्या वेळी ग्रामस्थ,शेतकरी व युवकांसोबत संवाद साधताना बोलत होते.



प्रास्ताविक आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी केले. यावेळी चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी उपसासिंचनचे पाणी माळावरील मोठ्या पाझर तलावात सोडण्यासाठी व ऊस गाळपासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना फोनवरून तात्काळ कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.

यावेळी ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी गावातील विविध प्रश्न व समस्या मांडल्या त्या सोडविण्याची ग्वाही देत मनमोकळेपणाने रणजितसिंह शिंदे यांनी संवाद साधला.बरेच प्रश्न व समस्या जागेवरुन सोडविल्या त्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी चेअरमन रणजितसिंह शिंदे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सोसायटीचे संचालक अशोक गव्हाणे व माजी सरपंच बालाजी गव्हाणे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी डीसीसी बँकेचे सेवानिवृत्त शाखाधिकारी अनिलकुमार अनभुले व प्रगतशील द्राक्ष उत्पादक शेतकरी अशोक गव्हाणे यांचा चेअरमन रणजितसिंह शिंदे व सेवानिवृत्त मुख्याध्यापक अनिलकुमार बरकडे यांचा उपळाई खुर्दचे सरपंच संदीप पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना माजी सरपंच अनिलकुमार बरकडे यांनी विठ्ठलवाडी येथील वैयक्तिक, सामाजिक व विकासात्मक कामे मार्गी लावताना सर्वसामान्य जनता व सर्व कार्यकर्त्यांना एकत्रित बोलावून विश्वासात घेऊन निर्णय घ्यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी उपळाई खुर्दचे सरपंच संदीप पाटील, चेअरमन अनिलकुमार अनभुले, अशोक गव्हाणे, सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड,माजी सरपंच बालाजी गव्हाणे, अनिलकुमार बरकडे,सहाय्यक अधिक्षक विजय गव्हाणे,लेखापरीक्षक सुहास शिंगाडे, सेवानिवृत्त बँक इन्स्पेक्टर नारायण खांडेकर, मुख्याध्यापक सौदागर गव्हाणे, उपाध्यक्ष भिमराव शिंगाडे, रामदास कोकाटे, धनाजी सस्ते, सत्यवान शेंडगे, पांडुरंग शिंगाडे, कांतीलाल मुळे, नेताजी कदम, धर्मा उमाटे, दत्तात्रय खैरे, मोहन भांगे, शिवाजी वाघमोडे, सतीश गुंड, अंकुश शिंगाडे, ग्रामसेवक सुधाकर गव्हाणे, श्रीमंत शिंगाडे, शिवाजी काशीद, शिवाजी कोकाटे, लहू शिंगाडे, कैलास सस्ते, तानाजी मोटे, अशोक कदम,संकेत गव्हाणे, प्रशांत कदम यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी व युवक उपस्थित होते.

सूत्रसंचालन करून आभार वाचनालयाचे माजी अध्यक्ष राजेंद्र गुंड यांनी मानले.

सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये पर्यावरणपूरक दीपावली उत्साहात साजरी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे पर्यावरणपूरक दीपावली उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी आकर्षक किल्ल्यांची निर्मिती करून छत्रपती शिवाजी महाराजांचा शौर्यशाली इतिहास आणि स्वराज्य स्थापनेचा गौरवशाली वारसा जिवंत केला. किल्ल्यांवरील तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वार आणि मावळ्यांच्या प्रतिकृतींनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तसेच विद्यार्थ्यांनी आकर्षक रांगोळ्या साकारल्या. मातीच्या पणत्या सजविणे, आकाशकंदील तयार करणे आणि दीपप्रज्वलन अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता, संघभावना आणि ऐतिहासिक वारशाविषयी आदर निर्माण होण्यास मदत झाली.

पारंपरिक पद्धतीने दीपावली साजरी करत पर्यावरणपूरक सणाचा संदेशही विद्यार्थ्यांनी दिला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निकहत शेख यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दीपावली उत्सव आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला.

संत नामदेव महाराज सायकल वारी शनिवारी माळशिरस तालुक्यात

वेळापूर व सादाशिवनगर येथे होणार वारीचे स्वागतं

अकलूज (कटूसत्य वृत्त):- संत शिरोमणी श्री नामदेव महाराज जयंती निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाणं (पंजाब) या सुमारे 2500 किलोमीटर सायकल वारीचे उदघाटन राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवार दि 21 नोव्हेंबर रोजी विश्रामगृह, श्री क्षेत्र पंढरपूर येथे करण्यात येणार असून ही वारी दसूर येथे सकाळी 7 वाजता माळशिरस तालुक्यात प्रवेश करेल. तालुक्यात वेळापूर येथे आ उत्तमरावं जानकर तर सदाशिवनगर येथे खा धैर्यशील मोहिते पाटील वारीचे स्वागतं करतील. या वारीत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सुमारे 160 सायकल रायडर्सनी सहभाग घेतला असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुर्यकांत भिसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, श्री नामदेव दरबार कमेटी श्री क्षेत्र घुमाणं (पंजाब), सायकल रायडर्स असोसिएशन व समस्त नामदेव शिंपी समाजाच्या वतीने सन 2022 पासून संत शिरोमणी श्री नामदेव महाराज रथयात्रा व सायकल वारीचे आयोजन करण्यात येते. वारीचे हे पाचवे वर्ष आहे.

21 नोव्हेंबर रोजी निघणारी ही रथयात्रा व सायकल वारी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा व पंजाब या पाच राज्यांचा प्रवास करुन 13 डिसेंबर रोजी श्री क्षेत्र घुमाणं येथे पोहोचणार आहे. सायकल वारीचा येथे समारोप करण्यात येणार आहे. पुढे हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या चार राज्यातून अडीच हजार किलोमीटरचा प्रवास करुन 21 डिसेंबर रोजी ही रथयात्रा श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचणार आहे. या रथयात्रा व सायकल वारीत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सुमारे 160 सायकल रायडर्स सहभागी झाले आहेत. हा या वर्षीच्या वारीचा उच्चाँक असून सायकल वारीत संत साहित्याचा प्रचार व प्रसार, आरोग्य, पर्यावरण, वृक्षारोपण, प्रदूषण, शिक्षण आदिविषयी प्रबोधन केले जात असल्याचेही भिसे म्हणाले.

या पत्रकार परिषदेस पालखी सोहळा पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष शंकर टेमघरे , उपाध्यक्ष सुभाष भांबुरे, सचिव ॲड विलास काटे, खजिनदार मनोज मांढरे, सदस्य राजेंद्रकृष्ण कापसे, राजेंद्र मारणे, राज्य समन्वयक गणेश उंडाळे, सायकल रायडर्स असोसिएशनचे सचिव सुरेंद्र पिसे, सोलापूर जिल्हाध्यक्ष शहाजी फुर्डे पाटील आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना कृषी साहित्य खरेदीवर ५० टक्क्यांपर्यंत अनुदान - चेतनसिंह केदार सावंत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा परिषदेच्या सेस (डीबीटी) योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विविध कृषी साहित्य व उपकरणांच्या खरेदीवर ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.



या योजनेंतर्गत कडबाकुट्टी यंत्र, पेरणी यंत्र, ५ एचपी व ७.५ एचपी क्षमतेचे विद्युत ओपनवेल सबमर्सिबल पंपसंच,(पाणबुडी मोटार), श्री पिस्टन स्प्रे पंप, ४ एचपी डिझेल इंजिन, बॅटरीवर चालणारे नेपसॅक स्प्रे पंप, रोटाव्हेटर, ताडपत्री, पल्टी नांगर आणि स्लरी फिल्टर आदी कृषी साहित्याचा समावेश करण्यात आला आहे.

शेतीचा वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता आणि आधुनिक शेतीची वाढती गरज लक्षात घेऊन ही योजना राबविण्यात येत आहे. अनुदानामुळे शेतकऱ्यांना आवश्यक कृषी साहित्य खरेदी करणे अधिक सुलभ होणार असून शेतीच्या कामात आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर वाढण्यास मदत होणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संबंधित पंचायत समिती कार्यालयातील टपाल (आवक-जावक) विभागात जमा करावेत. २५ नोव्हेंबर २०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या तसेच अपूर्ण असलेल्या प्रस्तावांचा स्वीकार केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी प्रस्ताव सादर करून या अनुदान योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.

कामगार संहितांबाबत जनजागृतीसाठी 18 नोव्हेंबर रोजी सोलापुरात 'श्रम संवाद'

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- भारत सरकारच्या कामगार व रोजगार मंत्रालयामार्फत देशभरात कामगार संहितांबाबत जनजागृती करण्यासाठी 'श्रम संवाद - जिल्हास्तरीय क्षमता बांधणी व जनजागृती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश नियोक्ते, औद्योगिक प्रतिनिधी, मानव संसाधन (HR) व वित्त विभागातील अधिकारी, कायदेविषयक व्यावसायिक, सनदी लेखापाल तसेच इतर संबंधित घटकांना कामगार संहितांमधील विविध तरतुदींची माहिती देणे आणि त्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे.

सोलापूर जिल्ह्यातील हा कार्यक्रम बुधवार, दि. 18 नोव्हेंबर 2026 रोजी दुपारी 1.30 ते सायंकाळी 5.00 या वेळेत सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, पी-7, जयकुमारजी पाटील उद्योग भवन, एमआयडीसी, चिंचोळी, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी, नियोक्ते, उद्योग प्रतिनिधी, मानव संसाधन (HR) व वित्त विभागातील अधिकारी, कायदेविषयक व्यावसायिक, सनदी लेखापाल तसेच इतर संबंधित घटकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कामगार संहितांबाबतची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर श्री. मंगेश रा. झोले यांनी केले आहे.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल
सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) इरफान पठाणचा भाऊ असलेला फलंदाज २) आशिर्वाद, नवरा मुलगा ३) पाणी, उदक ४) राजाचे दरबारातील बसण्याचे आसन ५) बंदूक (इंग्रजीत) ६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ७) सोने ८) चिखल, राडा ११) एकरूप, तल्लीन १३) शिजवलेला तांदूळ १५) राहुल गांधी यांचे चुलतबंधू १७) कोकणातील भाजपचे युवा आमदार-नितेश ** १९) जहाज २०) स्वामी तिन्ही जगाचा आईविना *** २२) चार आणि तीन मिळून होणारी संख्या २५) शिवसेनेचे महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २६) जोराची आरोळी (हिंदीत) २९) कर्नाटक राज्यातील एक जिल्हा ३१) नगरचे भाजपचे खासदार-*** विखे ३२) ज्ञान (हिंदीत) ३३) जर उलट लिहा ३५) वायू, पवन ३९) राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह ४१) हनुमानाच्या हातातील शस्त्र ४३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे जावई-सदानंद ** ४४) मराठी वर्षातील एक महिना ४५) पारंब्या असलेला वृक्ष ४६) फळ्यावर लिहिण्यासाठी हा वापरतात ४७) पत्र (हिंदीत) ४८) एक हजार कि.ग्रॅ.- एक ** ४९) शरीर, काया

आडवे शब्द : १) युवी या टोपण नावाने ओळखला जाणारा माजी भारतीय डावखुरा फलंदाज ६) नशीब (हिंदीत)
९) गाण्यातील लय, एक जुना ग्रामीण खेळ-** पारंब्या
१०) बारीकसारीक
१२) एक म्हण-** तो कान पिळी१४) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा
१६) भाकरी थापण्याचे मोठे पात्र १८) शहर
२१) मुंबई लगतचा एक जिल्हा
२३) लहान बाळाला टोचतात ती २४) उत्सवाचा दिवस २५) स्वार्थ, हेतू
२७) उन्हाळ्यातील एक महिना २८) कौरवांची आई ३०) वाईट सवय, तल उलट लिहा ३१) भाजपचे एक नेते -*** मुनगंटीवार ३२) अकरा (हिंदीत)
३४) पाकचे माजी पंतप्रधान-*** शरीफ ३६) पाण्याचे बाष्परूप ३७) दृष्टी
३८) रांग ४०) छ. शिवरायांच्या राजधानीचा किल्ला
४२) ऋतिक रोशन अभिनीत एक चित्रपट-** - अकबर ४४) आईची बहीण
४६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ४९) तलाव ५०) केळांचा समूह
५१) बेसनाच्या पिठाच्या बुंदीपासून बनवितात तो गोलाकार गोड पदार्थ
५२) भारताचा एक माजी विकेटकिपर-*** मोंगिया

सुडोकु - 100

	4	9		3	1			
	3			7		9	8	
8				4				
		6	1	5	7	8		2
	5		2	8	4	1		6
	1							5
	8	5	7		3	4		9
		2			5	3	7	
		4		2		5		1

आंबे विहीर दुर्घटनेच्या सखोल चौकशीसाठी समिती स्थापन

प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती आठ दिवसांत अहवाल सादर करणार - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- आंबे (ता. पंढरपूर) येथे विहीर खोदकाम सुरू असताना माती व दगडाचा मोठा ढिगारा कोसळून विहिरीत अडकलेल्या चार कामगारांच्या बचावासाठी प्रशासनाच्या वतीने राबविण्यात आलेले अभियान तब्बल २५ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर पूर्ण झाले. या दुर्घटनेत चारही कामगारांचा मृत्यू झाला असून, घटनास्थळीच वैद्यकीय पथकाच्या माध्यमातून मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर चारही मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, समिती आठ दिवसांत अहवाल सादर करणार आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.

आंबे येथे रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी विहीर खोदकाम सुरू असताना अचानक माती व दगडाचा मोठा ढिगारा कोसळला. या दुर्घटनेत चार कामगार ढिगाऱ्याखाली अडकले होते. घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन,



पोलीस यंत्रणा, महसूल विभाग तसेच संबंधित बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले.

रविवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून बचावकार्याला सुरुवात करण्यात आली. विहिरीतील माती व दगडाचा मोठा ढिगारा आणि निर्माण झालेली प्रतिकूल परिस्थिती यामुळे बचाव पथकासमोर मोठे आव्हान होते. बचावकार्यादरम्यान आवश्यक खबरदारी घेत एनडीआरएफच्या पथकाने उपलब्ध साधनसामग्री आणि तांत्रिक कौशल्याच्या आधारे मोहीम सुरू ठेवली. अखेर चारही कामगारांना बाहेर काढण्यात आले. मात्र, त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

एनडीआरएफ, प्रशासन आणि ग्रामस्थांचे बचावकार्यात समन्वय

या बचाव मोहिमेत एनडीआरएफच्या पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने बचावकार्य केले. जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आपदा मित्र, पोलीस यंत्रणा तसेच स्थानिक ग्रामस्थांनीही बचावकार्यासाठी आवश्यक सहकार्य केले. सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून ही मोहीम पूर्ण करण्यात आली.

बचाव मोहिमेचे संपूर्ण नियंत्रण जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः या ठिकाणी थांबून पार पाडले. तसेच कामगारांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले व धीर दिला. तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही रात्री एक वाजता आंबे येथे भेट देऊन बचाव मोहिमेची माहिती घेतली.

मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात

बचावकार्यादरम्यान रविवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास एका कामगाराचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर सोमवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास दुसऱ्या कामगाराचा, सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास तिसऱ्या कामगाराचा, तर सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास चौथ्या कामगाराचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. चारही मृतदेहांचे घटनास्थळीच वैद्यकीय पथकाच्या माध्यमातून शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विहीर बुजविणार

या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित विहिरीबाबत तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहेत. एनडीआरएफच्या पथकाने दिलेल्या तांत्रिक सल्ल्यानुसार संबंधित विहीर बुजविण्यात येणार आहे. तसेच विहिरीच्या कडेला बॅरिकेडिंग करून परिसर सुरक्षित करण्यात येणार आहे. भविष्यात या ठिकाणी अशा प्रकारची दुर्घटना घडू नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक खबरदारी घेण्यात येणार आहे.

दुर्घटनेच्या चौकशीसाठी समिती स्थापन

या दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी जिल्हा प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, समितीमार्फत संपूर्ण घटनेची सविस्तर चौकशी करण्यात येणार आहे. पुढील आठ दिवसांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगितले. विहीर खोदकाम सुरू असताना माती व दगडाचा ढिगारा नेमका कोणत्या कारणामुळे कोसळला, दुर्घटनेमागील तांत्रिक कारणे कोणती होती, तसेच कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या किंवा नाहीत, या सर्व बाबींची चौकशी समितीमार्फत तपासणी करण्यात येणार आहे. चौकशीत कोणाचीही जबाबदारी अथवा निष्काळजीपणा आढळून आल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्पष्ट केले.

नैसर्गिक दुष्काळाचं सावट दुर करण्यासाठी वैचारीक बळ मिळावे म्हणून साहित्य संमेलन आवश्यक



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मराठी भाषा समृद्धीसाठी साहित्य संमेलने भरवली जातात परंतु मनोरमा साहित्य मंडळी व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा पश्चीम महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने भरवलेले हे साहित्य संमेलन केवळ राज्य स्तरीय नसुन याची व्याप्ती अखिल भारतीय स्वरूपाची ठरली आहे. नैसर्गीक दुष्काळाचे सावट दुर करण्यासाठी वैचारीक बळ अशा साहित्या संमेलनातून मिळते. शिवाय मराठी भाषेची व्याप्ती वाढायला ही अधिक मदत होते असे सुर मान्यवर साहित्यिकांनी काढले.

शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ रोजी निर्मलकुमार फडकुले सभागृहात सदाशिवराव मोरे साहित्य दालनात एकदिवसीय साहित्य संमेलन जेष्ठ अर्थतज्ञ व मतृहृदयी कवी श्रीकांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले .

संमेलन भरविण्यासाठीची भुमिका आपल्या प्रास्ताविकात साहित्य संमेलनाच्या कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड यांनी मांडली. बॅन्केच्या प्रगतीचा चढता आलेख देखील स्पष्ट केला.

सर्वांचे स्वागत साहित्य संमेलनाच्या स्वागत अध्यक्षा शोभा मोरे यांनी करून संमेलनातील विषय, व्याप्ती व रूपरेषा यावर सविस्तर विवेचन केले. यावेळी निवड समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजशेखर शिंदे यांनी पुरस्कार प्राप्त साहित्यीकांच्या भुमीकांचा आशय विषद केला. मसपाचे सोलापुर जिल्हा प्रती निधी पद्माकर कुलकर्णी यांनी मनोरमा साहित्य मंडळीचे साहित्यिक क्षेत्रातील योगदानाची माहिती दिली. माजी जिल्हाधिकारी तथा सचिव अशोकराव काकडे यांनी मनोरमा साहित्य मंडळीनी उपेक्षित साहित्यीकांना व्यासपिठ मिळवून दिले ,सन २००९ पासून साहित्य समृध्दीसाठी मोठे योगदान दिले आहे.बॅन्कीग क्षेत्रासह अन्य प्रांतात देखील मनोरमा परिवार जोमाने कार्यरत असल्याचे सांगितले.

गुजरात येथील बडोदा विदयापिठाचे डॉ.संजय करंदीकर यांनी हे संमेलन राज्य स्तरा पुरते मयीर्दीत नसुन अखिल भारतीय स्वरुपाचे आहे.यातील विषयाची मांडणी व्यापक आहे. मनोरमा परिवार बॅन्कीग क्षेत्रापलीकडे माणुसकी जपणारा परिवार आहे. असे सांगितले .

अध्यक्षीय भाषणात श्रीकांत मोरे यांनी सोलापुर येथील समृध्द साहित्यिक परंपरा , सिध्दरामेश्वराच्या पवित्र भुमीतील जीवन समृध्द करणारी बसवेश्वराची वचने हीच आमचे खरे साहित्य आहे. मनोरमा परिवार अर्थकारणा बरोबर सुखी जीवनाचा मुलमंत्र देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगून सर्वांचे आभार मानले.

यावेळी स रा मोरे ग्रंथालयाचे वतीने मनोरमा नवोदीत उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार विजेते तरूण कादंबरीकार ओंकार काकडे व गुरूलिग कुरनुरकर यांच्या निरामय जीवन प्रवास या गौरव ग्रंथाचे प्रकाशन देखील करण्यात आले.

तसेच संभाजी नगर येथील उद्योजक बालाजी शिंदे व नाट्य दिग्दर्शक अभिनेता व कवि नितीन कोळवेकर यांनी देखील हे साहित्य संमेलन दिशादर्शक असल्याचे सांगून संयोजक व आयोजकांचे कोतुक केले.

प्रथम सत्रात गझलगायक प्रदिप निफाडकर यांची प्रकट मुलाखत सुत्रसंचलिका श्रुती हजारे व श्रीकांत मोरे यांनी घेतली.

त्यानंतर समृध्द मराठी भाषा यावर परिसंवाद झाला. शिवाय अनेक मान्यवर कविंनी आपल्या कविता सादर केल्या. यावेळी डॉ.संजय करंदीकर ,राधिका देशमुख,राजेंद्र घाडगे, भारत दौंडकर,गणेश भाकरे,सुवर्णा गुंड व ओंकार काकडे यांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी डॉ.सुमित मोरे ,कवि कल्याण शिंदे, ॲड.सुरेश गायकवाड, उद्योजक दत्ता आण्णा सुरवसे ,नसिमा पठाण, नगरसेवक विनोद भोसले ,मनोरमा चे संचालक गणपत कदम, प्रशांत शहापुरकर, दत्ता मुळे, गजेंद्र साळुंके, शिल्पा कुलकर्णि, प्रदिप मोरे, मारूती कटकदौंड, गोविंद काळे,इंद्रजीत घुले, शिवाजी सातपुते,योगीराज माने ,बालाजी गोप आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांचे शुभहस्ते दिपप्रजोलन करून झाली. कार्यक्रमास सोलापुर येथील साहित्यप्रेमी नी मोठी गर्दी केली होती.

एव्हीएसने दूध संकलनातील गुणवत्ताही जपली

दूध उत्पादकांना विक्रमी बोनस- माजी आमदार राजन पाटील

गुणवत्तापूर्ण दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- दूध उत्पादकांच्या दुधाला चांगला दर देण्यासोबतच वर्षभर त्यांच्या विविध अडीअडचणी सोडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य एव्हीएस दूध उद्योग समूहाने केले आहे. दूध उत्पादकांचे सर्वांगीण हित जपत गुणवत्तापूर्ण आणि विक्रमी दूध संकलन करून सभासदांना विक्रमी बोनस देण्याची परंपरा एव्हीएस समूहाने जपली आहे. समूहाचे हे कार्य राज्यातील इतर दूध उत्पादक संस्थांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार राजन पाटील यांनी केले.

मोहोळ तालुक्यातील एव्हीएस



दूध उद्योग समूहाच्या वतीने आयोजित दिवाळी बोनस वितरण कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी राज्यातील प्रसिद्ध दूध व्यावसायिक व तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. शैलेश मदने, सहायक निबंधक वहाब हमीद कुरेशी, पीबीएफएचे अध्यक्ष संजय सालगुडे, मिल्की मिस्टी मॅनेजर ऋषिकेश सरक पी एम डी मिल्क नाथा भोसले, ऋषिकेश एव्हीएस उद्योग समूहाचे मार्गदर्शक तानाजी माने, उमेश तळे, विशाल माने आदी मान्यवर उपस्थित होते.

दूध व्यवसायात केवळ संकलनाचे प्रमाण वाढविणे महत्त्वाचे नसून दुधाची गुणवत्ता टिकविणे, उत्पादकांना योग्य मोबदला देणे आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावणेही तितकेच आवश्यक आहे. एव्हीएस समूहाने या सर्व बाबींचा समतोल साधत दूध उत्पादकांचा विश्वास संपादन केला आहे. दिवाळीच्या निमित्ताने बोनस वितरणातून उत्पादकांच्या कष्टाचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात सर्वाधिक दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित मान्यवरांचा एव्हीएस उद्योग समूहाचे किरण माने, विशाल दळवी, वैभव पाटील, विनोद राजमाने आणि अजिनाथ सुळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. शैलेश मदने यांनी दूध उत्पादकांना दूध व्यवसायातील गुणवत्ता, उत्पादनवाढ आणि आधुनिक व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी एव्हीएस उद्योग समूहाच्या दूध उत्पादक संस्थांचे अधिकारी, दूध संकलन व वितरण कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य वाकडे यांनी केले, तर एव्हीएस ग्रुपचे डॉ. किरण माने यांनी आभार मानले.

निमसाखर-बांगर्डे यांना जोडणाऱ्या नीरा नदीवरील पुलाला २५ कोटींचा निधी

इंदापूर (कटूसत्य वृत्त):- इंदापूर तालुक्यातील निमसाखर आणि माळशिरस तालुक्यातील बांगर्डे या गावांना जोडण्यासाठी नीरा नदीवर नवीन पूल बांधण्यात येणार आहे.

या पुलासाठी केंद्रीय मार्ग निधीतून (सीआरएफ) तब्बल २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. या पुलामुळे दोन्ही तालुक्यांतील नागरिकांच्या दळणवळणाला मोठी गती मिळणार असून विद्यार्थ्यांचा धोकादायक होडी प्रवास थांबणार आहे.

निमसाखर हे या भागातील प्रमुख व्यापारी केंद्र आणि शैक्षणिक हब म्हणून ओळखले जाते. येथे मोठी शैक्षणिक संकुले असल्याने आसपासच्या गावांतील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. गावाच्या दक्षिण दिशेने वाहणाऱ्या नीरा नदीच्या पलीकडे माळशिरस तालुक्यातील बांगर्डे गाव वसले आहे.

नागरिकांची वर्षानुवर्षे निकड

बांगर्डे येथील ग्रामस्थांना दैनंदिन व्यवहार आणि बाजारपेठेसाठी, तर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी निमसाखरवर अवलंबून राहावे लागते. मात्र नदीवर पूल नसल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून होडीतून प्रवास करावा लागत होता. तसेच निमसाखर, दगडवाडी आणि निरवांगी परिसरातील नागरिकांना माळशिरस तालुक्यात जाण्यासाठी लांबचा वळसा घालून प्रवास करावा लागत असल्याने वेळ आणि पैसाही अपव्यय होत होता.

या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी निमसाखर, दगडवाडी, निरवांगी आणि बांगर्डे येथील ग्रामस्थांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पुलाची मागणी लावून धरली होती. नागरिकांची ही निकड ओळखून मंत्री भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या प्रकल्पासाठी निधी देण्याची आग्रही मागणी केली होती.

२५ कोटींचा निधी मंजूर

मंत्री भरणे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुलासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या निर्णयाने निमसाखर, दगडवाडी, निरवांगी आणि बांगर्डे येथील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी बोलताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, ह्हा पूल दोन्ही तालुक्यांतील नागरिक, शेतकरी आणि विशेषतः विद्यार्थ्यांसाठी संजीवनी ठरेल. येत्या तीन महिन्यांत निविदा व इतर सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून पुलाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्याचा आमचा मानस आहे.' दळणवळणाला गती

नवीन पूल बांधल्यानंतर निमसाखर आणि बांगर्डे यांच्यातील अंतर कमी होणार असून विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी सुरक्षित व सोयीचा मार्ग मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाची वाहतूक, व्यापारी दळणवळण आणि आरोग्य सेवेसाठीही हा पूल महत्त्वाचा ठरणार आहे. पावसाळ्यात नदी पार करण्याची गरज न राहिल्याने नागरिकांच्या अपघाताचा धोकाही कमी होणार आहे.

या प्रकल्पाच्या मंजुरीने इंदापूर-माळशिरस तालुक्यांतील नागरिकांची वर्षानुवर्षांची मागणी पूर्ण होण्याची आशा निर्माण झाली आहे.

तीन महिन्यांत प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्यासाठी प्रशासनाने निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्याचे नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे प्रादेशिक परिवहन विभागाकडुन, विशेष रिक्षा तपासणी मोहीम

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी व भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुकर आणि विनाअडथळा व्हावा, तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, या उद्देशाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने दिनांक 13 ते 15 नोव्हेंबर 2026 या कालावधीत पंढरपूर शहरात विशेष रिक्षा तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दोन वायुवेग पथकांमार्फत शहरातील एकूण 61 ऑटोरिक्षांची तपासणी करण्यात आली.

तपासणीअंती वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 20 ऑटोरिक्षांविरुद्ध मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

सदर मोहिमेदरम्यान रिक्षाचालकांना प्रवाशांकडून नियमानुसारच भाडे आकारण्याबाबत, गर्दीच्या ठिकाणी वाहन चालविताना विशेष खबरदारी घेण्याबाबत तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. विशेषतः चौपाळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर वारीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी व भाविकांची वर्दळ असते.

त्यामुळे सदर मार्गावर रिक्षा चालवू नयेत अथवा रिक्षा उभ्या करू नयेत, अशा स्पष्ट सूचना रिक्षाचालकांना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे पालन करून वाहतूक कोंडी टाळण्याबाबत चालकांचे प्रबोधन करण्यात आले.

कार्तिकी वारीच्या संपूर्ण कालावधीत अशा प्रकारची विशेष तपासणी मोहीम सुरू ठेवण्यात येणार असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

कार्तिकी वारीसाठी पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व रिक्षाचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, प्रवाशांकडून नियमानुसार भाडे आकारावे, गर्दीच्या ठिकाणी सुरक्षितपणे वाहन चालवावे, निर्धारित मार्ग व वाहतूक व्यवस्थेचे पालन करावे तसेच वारकरी व भाविकांशी सौजन्यपूर्ण व सहकायार्ची भूमिका ठेवावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, विजय पाटील यांनी केले आहे.

सोलापूरात रंगणार २० ते २२ नोव्हेंबरदरम्यान प्रिसिजन गप्पांची दिवाळी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'प्रिसिजन गप्पा' या सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा २० ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'दिवाळीनंतरची गप्पांची दिवाळी' रंगणार असून, संगीत, साहित्य, सामाजिक कार्य आणि पर्यावरण संवर्धन अशा विविध विषयांची मेजवानी सोलापूरकरांना अनुभवता येणार आहे. हा तीन दिवसीय कार्यक्रम सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. यंदाचे हे प्रिसिजन गप्पांचे १८ वे वर्ष असून, शुक्रवार २० नोव्हेंबर रोजी सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. ज्येष्ठ सामाजिक संशोधक व विचारवंत पद्मश्री डॉ. हिमतराव बावस्कर यांच्या हस्ते दोन्ही पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. यंदाचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार पुणे येथील 'थिंक क्रिएटिव्ह पर्यावरण दक्षता कृती मंच' च्या 'निसर्गवारी'प्रकल्पाला प्रदान करण्यात येणार असून, प्रकल्पाचे प्रवर्तक प्रशांत अवचट हे पुरस्कार स्वीकारतील. या पुरस्काराचे स्वरूप तीन लाख



रुपये व सन्मानचिन्ह असे आहे. तसेच स्व. सुभाष राजवजी शहा स्मृती पुरस्कार चाळीसगाव येथील राजेश ठोंबरे यांना त्यांच्या सर्पमित्र आणि वन्यजीव संवर्धन कार्यासाठी दोन लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार वितरणानंतर डॉ. हिमतराव बावस्कर यांची प्रकट मुलाखत दत्ता जोशी घेणार आहेत.

शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी हिंदी चित्रपट संगीताच्या सुवर्णकाळातील अजरामर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रसिद्ध संगीत अभ्यासक व गायिका डॉ. मृदुला दाढे-जोशी यांचा 'रहे ना रहे हम' हा विशेष कार्यक्रम सादर होणार आहे. हिंदी सिनेसंगीताचा सखोल अभ्यास, गाण्यांच्या आठवणी आणि संगीतप्रवासाचा वेध या कार्यक्रमातून घेतला जाणार आहे. त्यांना निलेश निरगुडकर, केदार परांजपे, ऋषिराज साळवी, दिगंबर मानकर आणि व्यंकटेश कुलकर्णी हे कलाकार साथसंगत करणार आहेत. अभिजित कुलकर्णी हे मृदुला दाढे यांच्याशी संवाद साधतील.

रविवार, २२ नोव्हेंबर रोजी प्रिसिजन गप्पांचा समारोप एका अविस्मरणीय संगीत कार्यक्रमाने होणार आहे. प्रसिद्ध संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी यांच्या गेल्या ३० वर्षांच्या संगीतप्रवासाचा मागोवा घेणारा विशेष कार्यक्रम सादर होईल. 'कवितेचं गाणं होताना...' या कार्यक्रमात डॉ. सलील कुलकर्णी यांच्यासोबत त्यांचे चिरंजीव शुभंकर कुलकर्णी आणि सन्मिता धापटे सहभागी होणार आहेत. डॉ. सलील कुलकर्णी यांची लोकप्रिय गाणी आणि संगीतनिर्मितीचा प्रवास रसिकांना अनुभवता येणार आहे.

या तीनही दिवसांचे कार्यक्रम सर्वांसाठी खुले असून,दररोज सायंकाळी ६.२५ वाजता कार्यक्रमांना सुरुवात होणार आहे.तरी सोलापूरकर रसिकांनी या तीन दिवसीय सांस्कृतिक सोहळ्याचा मोठ्या संख्येने आनंद घ्यावा, असे आवाहन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले आहे.

माढ्यातील चार महत्त्वाच्या प्रश्नांवर आ. अभिजीत पाटलांची पालकमंत्री गोरेंशी सकारात्मक चर्चा!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, पशुपालक, वारकरी भाविक आणि ऐतिहासिक वारशाच्या जतनाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर आमदार अभिजित पाटील यांनी सोलापूरचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी चार प्रमुख विषयांवर सकारात्मक चर्चा झाली असून संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी आमदार पाटील यांनी केली.

यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना दररोज आठ तास अखंडित वीजपुरवठा, दुष्काळी



परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करणे, पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात मुखदर्शनासाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था आणि माढा शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यात आधुनिक संग्रहालय उभारणे, या मागण्यांचा समावेश आहे.

पशुधन वाचवण्यासाठी चारा छावण्या सुरू करा

मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अत्यल्प पावसामुळे चारा टंचाईचे संकट निर्माण झाले आहे. हिरवा व कोरडा चारा उपलब्ध होत नसल्याने शेतकरी आणि पशुपालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पशुधन जगविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले असून शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करण्यास मान्यता द्यावी. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार पाटील यांनी केली.

विठ्ठल दर्शनासाठी मुखदर्शनाच्या चार ते पाच स्वतंत्र रांगा

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दररोज हजारो भाविक विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येतात. मुखदर्शनाच्या रांगेत होणारी गर्दी, लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग भाविकांची गैरसोय लक्षात घेता विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत मुखदर्शनासाठी चार ते पाच स्वतंत्र रांगा सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. यामुळे भाविकांची गर्दी नियंत्रित होण्यास मदत होईल, तसेच पददर्शनाच्या रांगेवरील ताणही कमी होईल.

भुईकोट किल्ल्यात आधुनिक संग्रहालय उभारण्याची मागणी

माढा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याचे जतन व संवर्धन करून या ऐतिहासिक वारशाला नवी ओळख मिळवून देण्याचा प्रस्तावही आमदार पाटील यांनी मांडला. किल्ल्यामध्ये आधुनिक सुविधांनी युक्त ऐतिहासिक संग्रहालय आणि डिजिटल माहिती केंद्र उभारण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील इतिहास, प्राचीन वस्तू, शस्त्रे आणि ऐतिहासिक घटनांची माहिती पर्यटकांना मिळू शकेल. त्याचबरोबर पर्यटनवाढीसह स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळू शकते.

मतदारसंघातील मूलभूत प्रश्नांसह शेतकरी, पशुपालक, वारकरी आणि ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाशी निगडित या चारही विषयांवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असल्याची माहिती आमदार अभिजित पाटील यांनी दिली. आता या मागण्यांवर शासनाकडून कितपत तत्परतेने निर्णय घेतला जातो आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होते, याकडे माढा मतदारसंघातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शेतीपंपांना आठ तास अखंडित वीज द्या

माढा व पंढरपूर तालुक्यांतील भीमा नदी, सीना नदी, येवती तलाव आणि सोनके तलावाच्या काठावरील शेतकरी सिंचनासाठी नदी व तलावांच्या पाण्यावर अवलंबून आहेत. सध्याची दुष्काळसदृश परिस्थिती आणि पिकांना पाण्याची असलेली गरज लक्षात घेता शेतीपंपांना दररोज किमान आठ तास अखंडित वीजपुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. वीजपुरवठ्यातील खंडामुळे पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी संबंधित वीज वितरण अधिकाऱ्यांना आवश्यक आदेश देण्याची मागणी करण्यात आली.